The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue 3; March 2024

# संत सेवालाल महाराजांच्यासामाजिकविचार व कार्याचेअध्ययन

**प्रा. बालासाहेब शिवाजी पवार** ( वाणिज्य विभाग )
माधवराव पाटील महाविद्यालय पालम

**प्रास्ताविक :**

संताची भूमी म्हणून महाराष्ट्राच्या भूमीलाओळखलेजाते. महाराष्ट्राच्या मातीला जसा प्रकरणाचा वारसा आहे तसा संत विचाराचा गंध देखील आहे. महाराष्ट्रात विविध जाती धर्मातील साधुसंत, कीर्तनकार प्रबोधनकार तसेच संतांनी जन्म घेऊन महाराष्ट्राच्या जडणघडणीचा विकास केलेला आहे. समाजामधील अज्ञान, वाईट चालीरीती व प्रथा नष्ट करण्याचे महान कार्य संतांनी केलेले आहे. आजच्या घडीला संतांचे विचार दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतात. संत महापुरुष हे विशिष्ट जातीत जन्माला येत असले तरी त्यांचे कार्य एका विशिष्ट समाजापुरते मर्यादित नाही. अशा थोर संतापैकी संत सेवालाल महाराज एकआहेत.

संत सेवालाल महाराज यांचा जन्म बंजारा समाजात माघ कृष्ण पक्ष 1661 मध्ये म्हणजेच दिनांक 15 फेब्रुवारी 1739 रोजी गोलाल डोडी तांडा ता. गुत्तीजिल्हा अनंतपुर (आंध्र प्रदेश) येथे झाला. आईचे नाव धर्मळी माता व वडीलाचे नाव भीमा नाईक असे होते.संत सेवालाल महाराज अजन्म अविवाहित राहून सामाजिक कार्य हाती घेत संपूर्ण मानव जातीला वाईट प्रथा सोडून देऊन कामच अंतिम सत्य आहे असे उपदेश केले आहेत. समाजामध्ये दारूबंदीसारख्याप्रथाबंदकरून स्त्रियांना अधिकारदिले. बंजारा समाजाला लोकगीत भजन, लडी च्या माध्यमातून प्रबोधन केले.

आज बंजारा समाज प्रगतीपथावर आहे. व्यापाराच्या निमित्ताने भारतभर भ्रमंती करत असताना संत सेवालाल महाराजांना भारतीय अनेक संतांच्या कार्याची माहिती मिळाली. त्यातून सत्याचा शोध घेऊन आपल्या समाजाला जागवण्याचा खरा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न केला. संत सेवालाल महाराजांचे विचार हे भगवान वर्धमान महावीर. संत कबीर,संत बसवेश्वर, संत तुकाराम, संत तुकडोजी महाराज,संत गाडगेबाबा महाराज यांच्या तोडीचे आहेत. संत सेवालाल महाराज हे दूरदृष्टीचे व विज्ञानवादी म्हणूनही त्यांची ओळख आहे जीव जंतू प्राणी व मानव जातीला उपयुक्त असे विचार संत सेवालाल महाराजांनी मांडले. त्यांनी म्हटलेले सर्वच विचार व अमर बोल आजच्या युगामध्ये खरे ठरत आहेत.म्हणूनच जगद्गुरु संत सेवालाल महाराजांची बंजारा समाजामध्ये एक आदर्श देव म्हणून पूजा केली जाते

**अध्ययनाची उद्दिष्टे** :

1) संतसेवालालमहाराजांच्याविचारांचाअध्ययनकरणे
2) संत सेवालाल महाराजांची सामाजिक विचार अभ्यासणे
3) संत सेवालाल महाराजांच्या कार्य अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:**

**प्रस्तुत** शोधनिबंधाकरितादुय्यम साधनसामग्रीचा म्हणजेच विविध संदर्भ ग्रंथ, विविध मासिके, शोधनिबंध, वर्तमानपत्रातील माहिती, जुन्या अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन, संकेतस्थळेइत्यादीचा वापर करून माहिती जमा करण्यात आलेली आहे.

**संत सेवालाल महाराजांच्यासामाजिक विचारांचेअध्ययनकरणे:**

जगद्गुरु संत सेवालाल महाराजांनी समाजाच्या उन्नतीसाठी महत्वपूर्ण कार्य करून बंजारा समाजाला प्रगतीपथाकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. सेवालाल महाराजांनी मानवतावादी विचारसरणी विचारात घेऊन संपूर्ण समाजाला उपदेश करताना प्राणी मात्रावर दया करा,निसर्गाचे संवर्धन करा, कोणतीही गोष्ट बुद्धीच्या कसोटीवर तपासून पहा, अनोळखी व्यक्तीवर सहज विश्वास ठेवू नका, स्वतःवर विश्वास ठेवा असे विचार संपूर्ण समाजासमोर मांडले.

1) **सत्याचामार्गस्वीकारकरण्याचीशिकवण:** सत्याच्या मार्गाची शिकवण देत असताना संत सेवालाल महाराज मानव जातीला उद्देशून असा संदेश देतात की....**"सत्यधर्म लिनताती रेणू! सदा सासीबोलणू !! हर वातेंन सोच समजन केवणू ! भवसागर पार कर लेणू!!"** सत्य हाच खरा धर्म आहे जीवनामध्ये नेहमी सत्याची आचरण करावे. नम्रतेने लीनतेने इतरांशी वागावे. प्रत्येक गोष्ट आधी समजून समजून घेऊन मगच बोलावे. अशी सत्य वागणूक असेल तर तुम्ही जीवन रुपये भाऊ सागरात तरुण जाल. कोणाचीही निंदा करू नये निंदा करण्यास मनाई केली कोणाचीही निंदा ना दोस्ती करून आपले आयुष्य व्यर्थ घालू नये असे त्यांनी सुचविले समाजामध्ये खोटं बोलून स्वतःचा विकास करू नये सत्याचा मार्ग स्वीकारा, नेहमी सत्तेच्या सोबत राहावे असा संदेश त्यांनी संपूर्ण मानव जातीला दिला.

2) **प्रगत विचाराचा पुरस्कार वउपदेश:** संत सेवालाल महाराजांनी समाजाला प्रगत विचाराचा पुरस्कार करण्यास सांगितले. असा विचार केला तर समाजाचा विकास होऊ शकतो. समाज प्रगतीपथावर जाऊ शकतो. समाजाची प्रगती करायची असेल तर एकी हेच एक शास्त्र आहे. शिक्षणाची जोड देऊन उच्च शिक्षण घेतल्यास निश्चितच विकास होईल. शिक्षणाबरोबरच व्यापार,उद्योग यावरत्यांनी भर दिलेला आहे.

3) **प्राणीमात्रावर दया करण्याची शिकवण :**प्राणीमात्रावर दया करण्याची शिकवण देत असताना संत सेवालाल महाराज म्हणतात " **किडी मुंगी न साई वेस, जीव जणगाणीन साई वेस,खुटामुंगरीन साईवेस, वाडी वस्तीन साईवेस.** संत सेवालाल महाराजांनी प्राणीमात्रावर दया करण्यास सांगितले आहे. प्राणी मात्रा याची हिंसा करू नये, प्राणीमात्राचे रक्षण करावे, गो संवर्धन करावे, प्राण्यावर प्रेम करावे, गाईचे संवर्धन करावे.गायी कसायला विकू नका, गाय ही आपल्या संसारात उदरनिर्वाचा साधन असल्यामुळे आपल्या मुला बाळाला प्यायलादूध देते, शेतीसाठी खत देते म्हणून गाईचे रक्षण करावे असे प्रतिपादन त्यांनी आपल्या विचारातूनकेले आहे.

4) **शांततेचा संदेश:** समाजामध्ये शांतता प्रस्थापितकरा. आपल्या कार्यावर संपूर्ण लक्ष केंद्रित करा. कोणी कोणाला कमी लेखू नका. कुणाची निंदा करू नका.दुसऱ्याचे मन दुखणार नाही याची काळजी घ्या. सर्व प्राणीमात्रावर दया करा त्याचप्रमाणे गोरगरिबांना सोबत घेऊन चला न्यायिक बाजूने कार्य करत रहा. गरिबावर अत्याचार अन्याय करू नका असा संदेश दिला.

5) **अन्यायाविरुद्ध लढाआणि त्याचा प्रतिकारकरा:** संत सेवालाल महाराजांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवायला सांगितले. अन्याय होत असेल तर त्याचा प्रतिकार केला पाहिजे. एकत्र येऊन उठाव केला पाहिजे अन्यायाचे समूह उच्चाटन हवे असेल सर्वांनी एकत्र येऊन त्याचा प्रतिकार केला पाहिजे. जर अन्याय केला तर त्याचा काय परिणाम होईल या संदर्भात त्यांनी शिकवण दिलेली आहे **" गोरगरीबेन दांडण खाय, सात पिढी वोर नरकेम जाय.वंशेरो दिवो कोणी रिय,पायरीरोभाटा वीय".**जर कुणी गोरगरीब, दीनदुबळे लोक,आडलेल्या नडलेल्या लोकांवर अत्याचार किंवा अन्याय करत असेल, त्यांना अडवून फसवणूक करत असेल, अडवणूक करून कोणी दबाव निर्माण करत असेल अशा परिस्थितीत त्यांच्याकडून पैसा उकळत असेल अशा लोकांच्या बाबतीत त्यांच्या सात पिढ्या नरकामध्ये जातील म्हणजेच नरकयातना समान परिणाम भोगावे लागतील. त्यांचा शाप लागल्यास तुमच्या वंशाचा दिवा सुधाराहणार नाही!म्हणजेच बरबादी होईल. एक वेळ अशी येईल दगड होऊन पायरीचा दगड म्हणून आपलीगंनतीहोईल".

6) **¡i} संत सेवालाल महाराजांचेसामाजिकविचार :** संत सेवालाल महाराजांनी विचार करत असताना बंजारा समाजाला संबोधत असे विचार मांडतातकी कामाचे नियोजन योग्य करा. अन्याय विरुद्ध लढा उभारा, आवाज उठवा. कामावर व कार्यावर आपला टार्गेट ठेवा. निश्चितच आपले हक्क व अधिकार आपण प्राप्त केल्यास आपली प्रगती

होईल. ज्याप्रमाणे पळसाचे पान पूर्ण गळून गेल्यावरही पळसाचे झाड उन्हाळ्यात देखील लालबुंद होते. त्याचप्रमाणे आपण कार्य केल्यानंतर संपन्न होताल. अशी सामाजिक शिकवण महाराजांनी दिलेली आहे.

7) **समता बंधुता मानवतेचा पुरस्कार :** संत सेवालाल महाराजांनी सामाजिक कार्य करत असताना समता बंधुता व मानवता वादाचा पुरस्कार केला पाहिजे असे सुचित केले आहे. भावा भावामध्ये वैर उद्भवू नये. एका विचाराने व एका ध्येयाने प्रेरित होऊन कार्य करणे आवश्यकचआहे असा उपदेश त्यांनी दिला.

8) **अंधश्रद्धा निर्मूलन:** अंधश्रद्धा निर्मूलनाच्या बाबतीत संत सेवालाल महाराज म्हणतात की समाजाचा विकास करायचा असेल तर बुवाबाजी अंधश्रद्धेपासून समाजाने दूर राहावे.अंधश्रद्धेमुळे समाज अधोगतीला जाऊ शकतो. समाजाणे विज्ञानवादी दृष्टिकोन बाळगला पाहिजे असे त्यांनी ठणकावून सांगितले.जो पर्यंत समाज विज्ञानवादी होत नाही, तोपर्यंत समाजाचा विकास होणार नाही असे त्यांनी स्पष्ट मत मांडले..स्वतःकडे विज्ञानवादी निरीक्षणातून पाहा स्वतःला ओळखाअसे त्यांनी सुचविले. या बाबतीत संत सेवालाल महाराजांनी बंजारा समाजासाठी पाच तत्वे म्हणजे पंचशील सांगितली आहे.

9) **" सनोसामळोगोरभा, चोरी मत कर जो कोई. धर्मरी बानी रकाडो भाई , दारूमतपिवजोकोई. वातकरजोनीतीधरमेरी, मतलोजीवकाडोमतलोई. "** बंजारा समाजांना उपदेश करत असताना संत सेवालाल असे म्हणतात की, मी आपणाला पाच महत्त्वपूर्ण अशा गोष्टी सांगणार आहे. त्या पुढील प्रमाणे ,**१)चोरी करू नका,२)नीती धर्माने वागा,३)दारू पिऊ नका,४)सत्य बोला खोटे बोलू नका,५)पशु बळी देऊ नका.** अशा महत्त्वपूर्ण पाच गोष्टी म्हणजेच पंचशील सेवालाल महाराजांनी सांगितले आहे.

10) **अहिंसेचा मार्ग दाखवणारे संत सेवालाल महाराज :**अहिंसेचा मार्ग दाखवताना संत सेवालाल महाराज असे म्हणतात की, केवळ कुणाची हत्या न करणे एवढेच नसून काया.वाचा आणि मनाणेकोणालाहीदुखवू नये हे अधिक समजून देत असतानाच पाळीवगाईचे उदाहरण दिले आहे. गाय कितीही भाकड असली तरी तिला कधीच कसायाला विकू नये .देव ही सर्वांची मागणी आहे. माय म्हणजे आई कोणावर रागावत नाही. तिला खूश करण्यासाठी पशुबळी देण्यापेक्षा ,मनोभावे प्रार्थना करून बेलफुलवाहून शिरा, नैवेद्य अरपनकरून प्रसन्न करावे.असा साधासोपा ईश्वर भक्तीचा मार्ग संत सेवालाल महाराजांनी सांगितले आहे.

11) **अत्याचारा विरोधात विचार :** समाजामध्ये छळ कपटबेईमानी करणाऱ्या लोकांवर सेवालाल महाराजांनी प्रहार केला आहे. समाजामध्ये कपटनीतीचा व्यवहार करून जे लोकांना फसवतील ते पापाचे भागीदार बनून नरकात जातील . ते 84 लक्ष योनी पापी बनवून भटकत राहतील. म्हणून कोणी कपट नीतीच, बेइमानीचा व्यवहार करू नये . चोरलुटारू माणसे असतील तर त्यांनी नीतिवान व चारित्र्यसंपन्न व्हावे असे सूचित केले आह.

12)**"जान जो, छान जो पचच मानजो. समाजाच्या उन्नतीसाठी समाजाच्या प्रगतीसाठी हे विधान खूप महत्वपूर्ण आहे".** समाजामध्ये प्रगती करायची असेल, यश प्राप्त करायचा असेल, आपले उद्दिष्ट पूर्ण करायचे असेल तर, सुरुवातीला जाणून घ्या.जे आपण कार्य करत आहोत किंवा एखादी गोष्ट आपण ऐकत आहोत. त्यामध्ये किती सत्यता आहे.याचा प्रथम शोध घ्या. नंतरच योग्य पाऊल उचला व कृती करा. आपल्या मनाला ग्वाही पटत असेल तरच ती गोष्ट करा व अनमोल विचार संत सेवालाल महाराज यांनी संपूर्ण समाजाला दिलेला आहे.

**समारोप**

जगद्गुरु संत सेवालाल महाराजांनी संपूर्ण मानव जातीला अत्यंत प्रभावी व संवेदनशील अशी सत्य वचने सांगून परिवर्तनाची भूमिका दिली आहे.संत सेवालाल महाराज निरक्षर असूनही त्यांनी समाजाला बुद्धीप्रामान्यवादाचे आणि विज्ञानवादाचे धडे शिकवीले आहेत. संत सेवालाल महाराजांची वचने, सामाजिक विचार आणि कार्य हे साध्या सोप्या व सरळ अशा बंजारा बोलीतील आहेत. संत सेवालाल महाराजांचे विचारही सर्वांसाठी महत्त्वपूर्ण आहेत. सतं सेवालाल महाराजांचे विचारधन संपूर्ण समाजाला व मानव जातीला विश्वबंधुत्वाची शिकवण, प्रगतीचा साधा सोपा उपाय, कामाविषयी असलेली आपली निष्ठा .दया क्षमा शांती असा अनमोल संदेशसेवालाल महाराजांनी दिले आहे.

2 जानेवारी 1773 रोजी रुई गड तालुका दिग्रस जिल्हा यवतमाळ येथे महाराजांचे देहावसान झाले. माऊली ज्ञानेश्वर महाराजा प्रमाणे सद्गुरू संत सेवालाल महाराज अल्प आयुष्यीठरले.उणेपुरे 34 वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले.मात्र या अल्पशा कालावधीत त्यांनी हिमालया एवढे महान कार्य केले. संत सेवालाल महाराजांची समाधी पोहरागड तालुका मानोरा जिल्हा वाशिम या ठिकाणी आहे. दरवर्षी राम नवमीला पोहरागडला लाखोच्या संख्येने बंजारा भाविक दर्शनासाठी येतात. फार मोठी यात्रा भरते. अशा या जगविख्यात जगद्गुरु क्रांतिकारी महंत बालब्रम्हचारी, विश्वविख्यात संताला कोटी कोटी नमन.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

1) चव्हाणगोविंदराव,-साप्ताहिक बंजारा पुकार, विशेषांक - संत सेवालाल महाराज,2012.
2) पवार प्रवीण,- गोर स्वाभिमान,प्रणाली प्रकाशन, नागपूर, 2018.
3) साहेब राठोड,- गोर बंजारा सद्यस्थिती व आव्हाने,हर्षवर्धन पब्लिकेशन, बी. जानेवारी 2020 .
4) भाई प्रेम सिंह जाधव, बंजारा दर्पण,औरंगाबाद. 2002
5) मोतीराज राठोड - बंजारा धर्म संस्कृती, नागपूर.
6) पद्मश्री रामसिंग भानावत, बंजारा धर्म पत्रिका.
7) राजकुमार तुकाराम राठोड,गोरबंजारा राज, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद. जानेवारी 2021.
8) बी.सुग्रीव- हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम, धमाळप्रकाशन चंद्रपूर, मार्च 2023.
9) https://en.on.wikipediya.org
10)https://bookganga.com